PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Gadbad Ghotala
Year: 1986

Song: Majhyach mage kiti lagshil go
Lyricist: Pravin Davane

माझ्याच मागं किती लागशील गो
माझ्यात काय असं सांगशील गो
माझ्याच मागं किती लागशील गो
माझ्यात काय असं सांगशील गो
तुला पाहून मी
मला पाहून तू
तुला पाहून मी
मला पाहून तू
डोळे मिटून रातभर जागशील गो
उन्हात चांदणं फिरतंय गो
धोक्याचं वय माझं झुरतंय गो
उन्हात चांदणं फिरतंय गो
धोक्याचं वय माझं झुरतंय गो
असा नवरा खुळा
बाई नक्को मला
असा नवरा खुळा
बाई नक्को मला
भर दिवसा तू खिडकी लावशील गो
माझ्याच मागं किती लागशील गो
माझ्यात काय असं सांगशील गो

दोघं उसाच्या मळ्यात जाऊ
हात प्रेमाचा हातात घेऊ
हां चारचौघात सांगू रे कशी
गोऱ्या गाली टोचते मिशी

घट्ट घेईन अशी तूच माझी मिशी
घट्ट घेईन अशी तूच माझी मिशी
पिळ मारूनी मजेत फिरविन गो
उन्हात चांदणं फिरतंय गो
धोक्याचं वय माझं झुरतंय गो
माझ्याच मागं किती लागशील गो
माझ्यात काय असं सांगशील गो

टंच उभार गोरा बांधा
भल्याभल्यांचा झालाय वांदा
तुझी काया ही मुसमुसलेली
आग इश्काची रसरसलेली
हे रंग जवानीचा डंख नागिणीचा
हे रंग जवानीचा डंख नागिणीचा
अंगा अंगाला नागोबा डसतोय गो
माझ्याच मागं किती लागशील गो
माझ्यात काय असं सांगशील गो
हां उन्हात चांदणं फिरतंय गो
धोक्याचं वय माझं झुरतंय गो

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*